# भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई - कचरा पृथक्करण मार्गदर्शिका - २०२१

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि द रिसायकल प्रोजेक्ट, भा. तं. सं., मुंबई चा उपक्रम


**संकेत चिन्ह**

महत्वाची टीप | ✅ काय करायचं आहे? | ❌ काय नाही करायचं आहे? | ℹ️ का करायचं आहे?

## दररोजचा कचरा कसा द्यावा


### १ स्वयंपाकघरातील कचरा

केवळ **सेंद्रिय कचरा** समाविष्ट करा.



- ✅ भाज्या आणि फळांची सालं.
- ✅ शिजवलेलं अन्न, चहा पूड.
- ✅ हाडं तसेच उरलेलं मांस.
- ✅ अंड्याचे कवच (छोटे तुकडे करून घालावेत ).
- ✅ फुलं आणि पानं.

आपल्या अंगणात फुलं-भाजी उगविण्याकरता आपण घरीच ह्या कचऱ्यापासून खत बनवू शकता. ह्या कामात मदतीची आवश्यकता असल्यास जन.स्वा. कार्यालय (पीएचओ) शी संपर्क करावा.




नारळाच्या करवंट्या वेगळ्या द्याव्यात.

❌ **ओले प्लास्टिक टाकू नका -** ओल्या व अस्वच्छ प्लास्टिक पिशव्यांना स्वच्छ धुवून वाळवा व त्यानंतरच रीसाइक्लिंगच्या पिशवीत जमा करा.

ℹ️ ह्याचा उपयोग सेंद्रिय खत बनवण्यासाठी केला जातो जो आपल्याला मोफत उपलब्ध केला जाईल.

### २ जाळण्यायोग्य कचरा


हा कचरा वेगळ्या पिशवीतून द्या. कागदी पिशवीवर लाल क्रॉस (X) बनवून द्या.



#### आरोग्य (स्वास्थ्य) संबंधित कचरा

- ✅ सैनिटरी पैड, टैम्पून, विघटनशील पॅड (बायोडिग्रेडेबल पॅड), डायपर, निरोध, इत्यादी.
- ✅ वापरलेले कापूस, जखमेवर बांधलेली पट्टी (बॅण्डेज), रक्त लागलेली पट्टी, सर्दी-खोकला झालेला असताना वापरलेले टिश्यु, इत्यादी.

❌ **ह्यामध्ये आरोग्यास धोकादायी (बायो-हॅझर्ड) कचरा मिसळू नका** - अधिक माहितीसाठी क्रमांक ६ पहा.



#### अन्य कचरा

- ✅ अस्वच्छ प्लास्टिक, कागद किंवा चिंध्या जे स्वच्छ करता येत नाही आहे.
- ✅ विघटनशील (कम्पोस्टेबल) प्लास्टिकची पिशवी.

अन्न किंवा तेल लागलेले कागद.

ℹ️ ह्यामुळे इतर कोणी मनुष्य अथवा प्राण्यांचा त्या वस्तूंशी संपर्क होणार नाही. हा कचरा चिन्हांकित करून वेगळं न ठेवणं तसेच हा कचरा लँडफिल मध्ये टाकणं हे असंवेदनशील तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्यास धोका निर्माण करणारे ठरेल.

### ३ लँडफिल (क्षेपण भूमी)

- ✅ घरातली धूळ, केस, कापलेली नखं.
- ✅ चिनी मातीच्या वस्तू.

ℹ️ लँडफिल हा सर्वात शेवटचा उपाय आहे. लँडफिल मध्ये कचरा टाकल्याने पर्यावरण प्रदूषित होते.आपण सर्वांनी कचरा निर्माण होणार नाही ह्यावर जास्त भर द्यावा (झिरो - वेस्ट कम्युनिटी).


❌ **ज्याचे रीसायकलिंग होऊ शकते अशी कोणतीही वस्तू टाकू नका** - अश्या सर्व वस्तुंना स्वच्छ करून रिसायकल करावे.

## आठवड्यातून दोन वेळा घेतला जाईल

रवि सोम **मं** बुध गुरु **शुक्र** शनि

### ४ पुनर्प्रक्रिया करता येईल असा कचरा

प्रत्येक वस्तू स्वच्छ आणि कोरडी असावी. रीसाइक्लिंगला देण्याआधी प्रत्येक वस्तू स्वच्छ धुवावी तसेच त्याला आतून कोरडे होऊ द्यावे.



#### कागद व पुठ्ठा


- ✅ वर्तमान पत्र, कागद, पुस्तक, पुठ्ठयाचे खोके आणि टेट्रा पॅक.

स्वच्छ व वाळवलेले **पिझ्झाचे डबे.**



#### जास्त दाबाचे हवा बंद डबे

- ✅ फवाऱ्याचे डबे (अत्तर किटक नाशक, रूम फ्रेशनर). सर्व डबे रिकामे असावेत. त्यांना छिद्र पाडू नये.



#### धातु

- ✅ डबे, बाटली, खेळणी आणि धातूच्या वस्तू .



#### प्लास्टिक

- ✅ पाण्याची बाटली, कडक किंवा मऊ प्लास्टिक, प्लास्टिकचे आवरण, वेगवेगळे स्तर असलेले प्लास्टिक (मल्टि लेयर), थर्मोकोल आणि स्टायरोफोम.
- ✅ खेळणी (इलेक्ट्रॉनिक भाग काढून तो इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या पिशवीत टाकावा. इलेक्ट्रॉनिक सोबत प्लास्टिक देऊ नका.)




#### काच

- ✅ काचेच्या वस्तू (बाटली, आरसा, भांडी).


फुटलेल्या काचेच्या वस्तुंना जाड कागदामध्ये किंवा प्लास्टिक मध्ये व्यवस्थित बांधून त्यावर "फुटलेली काच" असे लिहावे.

❌ **कोणतीही अस्वच्छ वस्तू ह्यात टाकू नका** - ज्या वस्तू स्वच्छ करणे शक्य नसतील फक्त त्यांनाच लँडफिल कचऱ्याच्या पिशवीमध्ये टाका.

❌ **चिनी मातीच्या कोणत्याही वस्तू ह्यात टाकू नका** - ह्या वस्तू क्षेपण भूमीला जाणाऱ्या पिशवीत टाकाव्यात.

❌ **इलेक्ट्रॉनिक भाग असलेल्या कोणत्याही वस्तू ह्यात टाकू नका** - वायर, इलेक्ट्रॉनिक वस्तु, इलेक्ट्रॉनिक कचऱ्यात टाकाव्यात.

### ५ इलेक्ट्रॉनिक कचरा



- ✅ वापरलेल्या बॅटऱ्या (सेल).
- ✅ ट्यूब लाइटस या बल्ब्स (फुटलेल्या असतील तर त्यांना व्यवस्थित बांधा व "**फुटलेली काच**" किंवा 'Broken Glass' असे लिहा).
- ✅ लॅपटॉप, टॅब्लेट, मोबाईल फोन, घरगुती इलेक्ट्रॉनिक उपकरणं.
- ✅ खेळण्यातील इलेक्ट्रॉनिक भाग, वायर, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, इत्यादी.


जितके शक्य असेल तितके दुरुस्त करून, उपकरणं जास्तीत जास्त वापरण्याचा प्रयत्न करावा.

### ६ आरोग्यास धोकादायी कचरा

#### स्वास्थ्य चिकित्सा संबंधीत कचरा



- ✅ सुई, आई. वी. फ्लुईड बॅग आणि औषधाची बाटली.
- ✅ थर्मामीटर, ब्लेड, वस्तरा आणि ग्लुकोमीटरची सुई.
- ✅ फेस मास्क आणि व्यक्तिगत सुरक्षा यंत्रणा (पि. पि. ई.).
- ✅ कालबाह्य झालेली औषधं.




फेस मास्क




फेस शिल्ड

हा कचरा दररोज द्यायचा असेल तर सार्वजनिक आरोग्य विभागाशी संपर्क करा.


### ७ अन्य कचरा



- ✅ जुने कपडे ( स्वच्छ धुतलेले असावेत).
- ✅ चप्पल
- ✅ लाकडी, लेदर आणि रबर वस्तू.
- ✅ लाकडी सामान, गाद्या, उश्या आणि मोठे कापड.
- ✅ मोठी इलेक्ट्रॉनिक उपकरणे.
- ✅ कोणताही जड कचरा.
- ✅ सायकल आणि बाबागाडी.



### ८ पाळीव प्राण्यांचे मल-मूत्र



- ✅ सर्व पाळीव प्राण्यांचे मल-मूत्र शौचालयात टाकावे. अधिक माहितीकरिता वेबसाईट पहा.

**शक्य आहे तितका कमी कचरा निर्माण करा आणि पुन: वापर करा.**

अधिक माहिती व सल्ल्याकरिता www.iitb.ac.in/deanpl/pho.html पहा.

**सार्वजनिक आरोग्य विभाग, भा. तं. सं. मुंबई**

office.pho@iitb.ac.in • दूरध्वनी क्रमांक - ७०५६, ४९५६